महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
ग्राहक तक्रार निवारण मंच
कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ६१/२०१७-१८/ 78 दिनांक: ०५.०४.२०१८

**आदेश**

**आदेश केस क्र. ६१/२०१७-२०१८(दि.०५.०४.२०१८)**

| | | |
|---|---|---|
| श्री जियाअहमद सी. मोमीन(बिल्डर)<br>पंचम हाइटस १८६८ , मंगळवार पेठ,<br>कोल्हापूर | : | **तक्रार अर्जदार (ग्राहक** |
| **विरुध्द** | | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | | |
| २) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>शहर विभाग कोल्हापूर | | **विरुध्द पक्षकार** |
| ३) उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग मध्य, कोल्हापूर | | |

**कोरम:-** १.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही.. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

5/4/18

१) प्रस्तुतचे प्रकरण आज रोजी सुनावणीस घेण्यात आले तक्रारदारातर्फे , सौ. दिपा विजय सावर्डेकर, श्री श्रीकांत पांडूरंग पाटील, श्री अभय ग्रामोपाध्ये, निसार शेख, तर विरुध्द पक्षातर्फे श्री ए.व्ही. अस्वले,अतिरिक्त कार्यकारी अभियंता , हे हजर होते.

२) तक्रारदारांची थोडक्यात तक्रार अशी की, श्री जिया अहमद मोमीन हया बिल्डरने बांधलेल्या पंचम हाईटस हया इमारतीत एकूण ५ फ्लॅटस्/सदनिका, श्री मिसार शेख, दिपा वार्डेकर श्री अभय ग्रामोपाध्ये, श्री निर्मल थोरवत व श्रीकांत पांडूरंग पाटील हयांनी विकत घेतलेले असून, ते त्यांच्या सदनिकांत राहत आहेत. सदर इमारतीमध्ये सामायीक वापराच्या लिफ्ट व पाण्याची मोटर हयाकरिता सदर बिल्डर श्री जिया मोमीन हयांचे नावे घरगुती विज कनेक्शन घेतलेले असून त्यांच्या ग्राहक क्र. २६६५१७८२१९८५/२ असा आहे. सदर सामायीक कारणा करीता सरासरी वापर २०० ते २५० युनिटस प्रति महिना, असा होतो. परंतु माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये अचानकपणे १४३४ युनिटचे वाढीव बिल आलेले आहे. सदर महिन्यांत कोणता अतिरिक्त वापर न होता जादाचे बिल आकारण्यांत आलेले आहे, तरी ते बिल रद्द करुन सरासरी वापराप्रमाणे विज बिल आकारण्यांत यावे. सदर ग्राहकाने तशी विनंती करणारा अर्ज अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दाखल केला असता सदरचा अर्ज अंतर्गत कक्षाने तो दिनांक १७.०१.२०१८ चे आदेशाने फेटाळलेला आहे. सबब प्रस्तुत तक्रार हया मंचाकडे दाखल करण्यांत आलेली आहे.

३) विज वितरण कंपनीचे निवेदन असे की, श्री जिया अहमद सी मोमीन, ग्राहक क्र.२६६५१७८२१९८५ पी.सी.२ हयांना माहे नोव्हेंबर-२०१७ मध्ये १४३४ युनिट इतक्या विज वापराचे रुपये १७,५७२.१३ इतक्या रक्कमेचे देयक गेलेले आहे.सदरचे देयक चुकीचे असल्याबाबत ग्राहकांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे अर्ज दाखल केल्यानंतर , त्या विज जोडनीचा मिटर चाचणी विभागाकडून पडताळणी करुन घेतली असता सदरचा मिटर योग्य व बरोबर असलेबाबत चाचणी विभागाने पत्र क्र. काअ/मिचावि/शहर/११३ दिनांक १२.१२.२०१७ हया द्वारे कळविलेले आहे, त्यामुळे नोव्हेंबर २०१७ चे देयक संबंधीत ग्राहकाने भरणे क्रमप्राप्त आहे. सबब प्रस्तुतची तक्रार खारिज करणेत यावी.

४) उभय पक्षकरांच्या , युक्तिवाद व त्यांची पक्षकथने हया वरुन खालील मुद्दे आमच्या निष्कर्षास उपस्थित होतात.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १) माहे नोव्हेंबर २०१७ चे देयक चुकीचे व वाढिव बिल आहे, हे तक्रारदाराने शबित केले आहे काय? | नाही. |
| २) अंतिम आदेश | तक्रार नामंजूर करण्यांत येत आहे |

५) आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण

5/4/2018

**कारणे**

६) **मुद्दे क्र.१ व २:-** तक्रारदारांची मुख्य तक्रार माहे नोव्हेंबर २०१७ च्या देयका संबंधी आहे. सदरचे देयक हे नोव्हेंबर २०१७ हया महिन्यातील १४३४ युनिटस इतक्या विज वापरा बाबतचे आहे. तक्रारदारांच्या कथनानुसार त्यांचा सदर मिटर मधून प्रती महिना सरासरी २०० ते २५० युनिटस एव्हढाच विज वापर होतो असे असतांना देखील केवळ त्यांच महिन्यात १४३४ युनिटसचे बिल आलेले आहे, ते चुकीचे आहे, सबब त्यांस सदरचे बिल रद्द करुन सरासरी प्रमाणे विज वापराचे बिल/देयक द्यावे.

७) सदरचे बिल चुकीचे आहे . हे दाखविण्याकरिता , तक्रारदारांनी कोणताही तांत्रिक पुरावा हया मंचा समोर आणलेला नाही. केवळ आधीच्या काळांत आलेल्या कमी युनिटसच्या बिला वरुन तक्रारदार माहे नोव्हेंबर २०१७ चे बिल चुकीचे आहे असे म्हणतात. सामाईक वापराचे विज मिटर (लिफ्ट व पाणी) हे चाचणी विभागाने , तक्रारदारांच्याच अर्जा वरुन अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे प्रकरण प्रलंबित असताना, तपासले होते व ते मिटर योग्य व निर्दोष असल्याबद्दलचा अहवाल दिलेला आहे, ही बाब तक्रारदारींनी मान्य केलेली आहे. विज वितरण कंपनीतर्फे श्री अस्वले, अतिरिक्त कार्यकारी अभियंता ,मध्य उपविभाग, कोल्हापूर हंयानी सदर मिटरचा दिनांक २६.१०.२०१७ ते १७.११.२०१७ हया काळाचा M.R.I. Report, दाखल केला आहे. सदर M.R.I. अहवालानुसार दिनांक २७.१०.२०१७ ते ०९.११.२०१७ हया कालावधीत , सदर मिटर मधून ४६ युनिटस ते ५८ युनिटस इतका विज वापर रोजच्या रोज झालेला आहे. हा वापर दिनांक २६.१०.२०१७ व दिनांक १०.११.२०१७ ते १७.११.२०१७ हया दिवसांच्या वापरा पेक्षा जास्त आहे. सदर कालावधीत जास्ती विज वापर झालाच नाही असे तक्रारदारांचे म्हणणे आहे. परंतु वर नमूद M.R.Iअहवाला वरुन सदरचे म्हणणे खोटे असल्याचे दिसते.विज मिटर चाचणी अंती योग्य व निर्दोष आढळल्यांचे तक्रारदार नाकारत नाहीत. ते वापरत असलेल्या सामाईक विद्युत साधनांमध्ये , जसे की, Lift किंवा पाण्याची मोटर, हया मध्ये काही दोष होता असेही तक्रारदार म्हणत नाहीत किंवा शाबित करीत नाहीत. त्यामुळे सदर कालावधीतील विद्युत देयक हे योग्यच आहे. असा निर्ष्कष काढावा लागेल. सबब वर नमुद मुद्दा क्र.१चे उत्तर आम्ही नकारार्थी दिलेले आहे.

८) वर नमुद मुद्दा क्र.१ च्या निष्कर्षामुळे प्रस्तुतची तक्रार खारीज करावी लागेल. अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने देखील योग्य निर्णय पारीत करुन तक्रारदारांची तक्रार फेटाळलेली आहे. सबब आम्ही खालील आदेश पारीत करित आहोत.

**आदेश**

१) प्रस्तुत तक्रार खारीज करणेत येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

5/4/296

GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

5/4/18 5/4/2018 5/4/2018

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. पुजारी) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण